

मनीषा गुप्ते

# लैंगिकता आणि स्त्री चळवळ : भाग २

**मुलाखत : मनीषा गुप्ते  मुलाखतकार आणि शब्दांकन : हिना कौसर खान**

**मनीषा गुप्ते मासूम या संस्थेची संस्थापक आणि स्त्रियांचं आरोग्य-लैंगिकता यावर स्त्रीवादी दृष्टिकोनातून खोलवर अभ्यास असलेली कार्यकर्ती. मासूमचं काम पुणे जिल्ह्यातल्या अनेक खेडोपाडी, वाड्यावस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून चालतं आहे. त्यातून आलेले जमिनीवरचे अनुभव-स्त्रियांचं उपजत शहाणपण-परिस्थितीनं तिला उचलावं लागलेलं पाऊल यामुळं या ग्रामीण स्त्रियांना लैंगिकता ही गोष्ट अभ्यास म्हणून समजत नसली तरी रोजच्या जगण्यातून आलेलं शहाणपण अचंबित करणारं आहे. मनीषानं हा धागा पकडून लैंगिकता आणि त्याला जोडून येणाऱ्या रोजच्या जीवनातल्या गोष्टींची उकल केली आहे. तरुण पत्रकार, लेखिका आणि आरोग्यसेवेत कार्यरत असणारी हिना हिनं अचूक प्रश्न विचारत तिला बोलतं केल्याचं नक्की जाणवतं. ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त आमच्या शरीरावर आमचा हक्क याला अधोरेखित करत  दोन भागात असणारी ही मुलाखत जरूर वाचा आणि आपले अभिप्राय जरूर कळवा.**

गेल्या दशकातील ऑलिम्पिक्समध्ये स्त्री पुरुषांचे हार्मोन्स या विषयावर वाद उद्भवत राहिला आहे. मागील वर्षी (२०२४) उन्हाळी ऑलिम्पिक्समध्ये मुष्टियुद्ध  (boxing) विजेती ठरलेली अल्जेरियाची इमान खलिफ ही स्त्रीसारखी 'दिसत' नाही, तिच्या बुक्क्यांच्या मारांचा जोर प्रतिस्पर्धी महिलेला सोसला नाही म्हणून इमान महिलांच्या स्पर्धेत भाग घेऊ शकत नाही आणि ती मुळात स्त्रीच आहे का यावर बरीच चर्चा रंगली. समाजात स्त्री पुरुष यांच्या दिसण्याच्या ठरावीक पठडीतील चौकटी आहेत, व त्या प्रमाणे भासले नाही तर ती व्यक्ती स्त्री किंवा पुरुष ठरत नाही असं मानणारा मोठा वर्ग आहे. आता तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केवळ दोनच लिंग असतात असे म्हणून ट्रान्सजेन्डर अशी ओळख असणाऱ्या शेकडो लोकांच्या नोकऱ्या हिरावून घेऊन या संकुचित विचारसरणीवर शिक्कामोर्तबच केले आहे.

स्त्री-पुरुषांच्या कथित binary चौकटी बऱ्याच प्रमाणात युरोपमधील देशांनी आपल्यावर वसाहतवादाच्या काळात लादल्या, मात्र, आज ते देश/उपखंड त्यातून बाहेर पडून पुढे गेले आहेत आणि आपण त्यात अडकून राहिलो आहोत. समलैंगिक नात्यांचे गुन्हेगारीकरण करणारे कलम (सेक्शन ३७७) ब्रिटिशांनी आपल्या कायद्यात आणले. ते आता अस्तित्वात नाही ही समाधानाची बाब आहे; पण अजूनही समलिंगी व्यक्तींना लग्न करायचा हक्क आपल्या देशात मान्य झाला नाहीये.

पूर्वापारपासून दक्षिण आशिया उपखंडामध्ये हिंदू आणि मुसलमान या दोन्ही पंथांमध्ये ट्रान्सजेंडर/पारलिंगी, तसेच मिश्रलिंगी (intersex) व्यक्तींची दाखल घेतली गेली आहे; बायबलमध्ये सुद्धा मिश्रलिंगी आणि किन्नर व्यक्तींचा उल्लेख आहे. गुजरातमध्ये मोरावर स्वार झालेली बहुचरादेवी हिजडा समूहाची आराध्य दैवत मानली जाते. रामायणात पारलिंगी व्यक्तींचा उल्लेख आढळून येतो: लंकेहून राम, सीता आणि लक्ष्मण अयोध्येत परत येतात तेव्हा त्यांना नगराच्या वेशीबाहेर एक समूह वसलेला दिसतो. वनवासाला निघत असताना शोकाकुल अयोध्या निवासी त्यांच्याबरोबर वेशीबाहेर येऊ लागल्यावर रामाने सर्व स्त्री-पुरुषांना माघारी जाण्यास, आणि भरताच्या राज्याला सहकार्य करण्यास विनंती केली. पारलिंगी व्यक्तींचा उल्लेख न झाल्यामुळे हा समूह चौदा वर्षे अयोध्येच्या वेशीवरच राहिला अशी ही हृदयस्पर्शी आख्यायिका आहे. महाभारतात सुद्धा स्त्री-पुरुष या चौकटी बाहेरचे उल्लेख आहेत. अर्जुन एक वर्ष स्त्री वेशामध्ये राहिला. तसंच, भीष्माचार्यांवर सूड घेण्यासाठी अंबा ही राजकन्या पुढील जन्मात शिखंडीच्या मिश्रलिंगी /किन्नर रुपात द्रुपद राजाच्या घरात जन्म घेऊन युध्दात त्यांचा वध करते. भस्मासुराचा वध करण्यासाठी विष्णूने मोहिनीचे रूप धारण केले हे तर आपण गोष्टीतून आणि मोहिनीअट्टम नृत्यातून अनुभवले आहेच.

ऑलम्पिकच्या बाबतीत म्हणायचे झाले तर इमान खलीफ ट्रान्सजेंडर/पारलिंगी नाही. LGBT समूहातील असती तर अल्जेरियामध्ये तिला कायद्याच्या पातळीवर शिक्षा आणि

समाजाच्या पातळीवर भेदभाव सोसावा लागला असता; ऑलिम्पिक खेळांसाठी देशाचे प्रतिनिधित्व कदापि करू दिले नसते. तसेच, ती मिश्रलिंगी (शारीरिक, हार्मोन्स किंवा क्रोमोझोमच्या पातळीवर intersex) असल्याचा कोणताही पुरावा देता आला नाही. स्त्री-पुरुष अशा घट्ट चौकटींच्या साचामुळे भारताची धावपटू दुती चंदबद्दल २०१४ च्या ऑलिम्पिक्समध्ये पुरुषी होर्मोन्स अधिक असल्याचा गदारोळ उठवून तिला खेळातून बाद केले गेले होते; हा निर्णय २०१५ मध्ये मागे घेण्यात आला. आपण समलिंगी असल्याचे दुतीने २०१९ साली जाहीर केले (आजपर्यंत आपली लैंगिकता उघडपणे जाहीर करणारी ऑलिम्पिक पातळीवरील ती एकमेव भारतीय खेळाडू आहे). ती इमान खलिफच्या बाजूने खंबीरपणे उभी राहिली म्हणून तिचे कौतुक करणे गरजेचे आहे.

इंटरसेक्स किंवा मिश्रलिंगी हे ट्रान्सपेक्षा वेगळं आहे. बाह्यलिंग आणि आंतरलिंग पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी यांचे मिश्रण असणं म्हणजे इंटरसेक्स. मानवाच्या प्रत्येक पेशीमध्ये ४६ गुणसूत्रे असतात. ती जोडी-जोडीत असतात. म्हणजे एकूण २३ जोड्या. बायकांमध्ये सगळी गुणसूत्रे एक्स आकारात असतात, तर पुरुषांमध्ये ४५ एक्स आणि एक वाय असतो. आता समजा की माझ्या गुणसुत्रांत एक छुपा वाय आढळला तर आजपासून मी कोण? पौगंडावस्थेत मला पाळी येत नसेल किंवा माझ्या चेहऱ्यावरती खूप लव आली अशा कुठल्याही कारणाने माझा हार्मोनल ॲनालिसिस केला आणि कळलं की माझ्या शरीरामध्ये ॲस्ट्रोजेन कमी आणि तुलनेत टेस्टोस्टेरोन जास्त प्रमाणात आहे - मग त्यानंतर मी कोण? माझे माणूस असणे क्षणार्धात संपुष्टात येते का? हे प्रश्न आपल्याला पडले पाहिजेत. वंचितत्वाचे अनुभव आणि त्यातून आपली ओळख आणि अस्मिता कायम टिकवून ठेवण्यासाठी केलेले संघर्ष समजून घ्यायचे असतील तर तसे जिवंत अनुभव असलेले समूहच आपले योग्य मार्गदर्शन करू शकतील. आपल्याला पारंपरिक पठड्या बाजूला ठेऊन, आणि नव्या पद्धतीने विचार करून पुनश्च शिकावे लागणार आहे, पण ते करण्या अगोदर लहानपणापासून शिकवले गेलेले पूर्वग्रह दूर सारणे अत्यावश्यक असेल. कोणत्याही समूहाचे प्रश्न खऱ्या अर्थाने समजून घ्यायचे असतील तर त्या मोहिमेचे नेतृत्व त्या समूहाने करणे आणि आपण त्यांचे मित्र, समर्थक आणि सहकारी असणे हाच मार्ग योग्य ठरेल.


मुल जन्माला येताच 'बाळंतीण जगली की मेली' हे विचारायच्या आधी 'काय झालं?' हे विचारलं जातं. नाकाची ठेवण, डोळ्यांचा रंग इत्यादीबद्दल 'नंतर सांगतो' असं म्हणून, सासरचे प्रश्न विचारत आहेत की माहेरचे यावर आधारित politically correct उत्तर देऊ शकतो, मात्र 'मुलगा की मुलगी?' या प्रश्नांच्या उत्तराला वेळेचा अवधी अजिबात नसतो. 'पास की नापास' हे लागलीच सांगावे लागते. बाई मुलीला जन्म देऊन नापास झाली असेल तर अजून एक दोन चान्स तरी दिले जाऊ शकतात, पण मुल नक्की मुलगा आहे की मुलगी हेच सांगता आले नाही तर काय होईल हा विचार सुद्धा आपल्या मनाला शिवून जात नाही. काही क्षणांपूर्वीच पालक झालेले दाम्पत्य उत्तर शोधण्यासाठी केविलवाणी धडपड करू लागते, अनेकदा मुल जन्माला आलंय ही बातमीच दोन चार दिवस दडपून ठेवली जाते, डॉक्टरांची मनधरणी केली जाते. मग काही तासांच्या असलेल्या बाळाचे शरीर मुलगा किंवा मुलगी अशा चौकटीत बसवण्याच्या प्रयत्नात बाह्यलिंग कायमचे बदलून टाकले जाते. पुढे त्या व्यक्तीला त्यातून काय त्रास भोगावे लागतील याचा कोण विचार करतो! प्रत्येक कुटुंब आपापला 'तोडगा' गुपित ठेवून निघून गेलेला असतो, त्यामुळे पुढचे मिश्रलिंगी बाळ जन्माला आले की त्या कुटुंबाशी बोलायला, 'लागलीच निर्णय घेऊ नका, काही वर्षांनी मुल कसं वाढतंय हे बघा, मुलाशी संवाद साधा' असं समजावणारे कोणीच उरत नाही. आपल्याला आश्चर्य वाटेल, पण जगात साधारणपणे १.५ ते २.० टक्के व्यक्ती कोणत्या ना कोणत्या वैशिष्ट्यामुळे मिश्रलिंगी असू शकतात. जोपर्यंत अस्तित्वच नाकारलं आणि लपवलं जात असेल, जन्मलेलं शरीर कोणते होते याची स्वतःला सुद्धा माहिती नसेल तोपर्यंत मिश्रलिंगी व्यक्ती आत्मविश्वासाने आपली कथा-व्यथा कोणत्या शब्दांत मांडणार? समाजाच्या शब्दकोषात जेव्हा सर्व व्यक्तींचे अनुभव मांडण्यासाठी सन्मानार्थी शब्द येणार नाहीत तोपर्यंत वंचितत्व कायम राहणार यात शंका नाही. स्वायत्त स्त्रीवादी चळवळ उभी राहण्याअगोदर 'बलात्कार' हा शब्दकोषात असलेला शब्द सुद्धा उघडपणे उच्चारला जायचा नाही. त्याआधी बलात्कार झाले नव्हते का? पाटलाच्या वाड्यावर बलुत्यांच्या नववधू पाठवल्या जाणे, शेतात किंवा कामाच्या ठिकाणी मालकाने बाईला धरणे हे प्रकार घडतच होते. 'विनयभंग', 'इज्जत लुटली', इंग्रजीमध्ये 'इव्ह टीझिंग' ('ॲडम टीझिंग' असं काही असतं का?) असे शब्द वापरून मानवाधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या कृतीचे गांभीर्य कमी करणे किंवा ते कुटुंबाच्या इभ्रतीशी जोडणं असा प्रकार होता. या अत्याचाराला वाचा फुटली ती बळी जाणाऱ्या किंवा शोषित व्यक्तींच्या संघटीत होण्याने आणि शोषक वर्गाला अथवा व्यक्तीला जाब विचारल्याने.

मग ट्रान्स म्हणजे काय? समजा, मी जन्माला आले तेव्हा लोकांनी म्हटलं की मुलगी जन्माला आली (sex assigned at birth, female). पण नंतर मला असं तीव्रपणे जाणवू लागतं की मी मुलगी नाहीये. दर महिन्याला येणारं मासिक पाळीचं रक्त माझ्या मनाला त्रास, यातना देतं. माझी छाती वाढते, ती दिसू नये म्हणून मी बांधून ठेवते. मला हे गर्भाशय नको वाटतं. माझं शरीर मला दगा देत आहे असं वाटल्याने खिन्न वाटू लागतं. आणि याबद्दल बोलणार कोणाशी? घरीदारी मार खाण्यापलीकडे दुसरं काही भविष्य दिसतच असेल, शाळेत मुलगे, शिक्षक आणि इतर पुरुष

लैंगिक अत्याचार करत असल्यामुळे शिकावेसे वाटत नसेल तर केवळ मी कोण आहे या ओळखीमुळे कुचंबना होत असेल तर मग एखाद्या मुलग्याला साडी नेसावीशी वाटते एवढ्याच कारणासाठी घरातून पळून जाणे यापलीकडे पर्याय उरत नाही. एक गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, बरं का. स्वयंपाक करणारा पुरुष, बाहुलीशी खेळणारा मुलगा, क्रिकेट खेळणारी महिला किंवा जीन्स घातलेली केस कापलेली मुलगी ट्रान्स असतात असं नाही. समाजाने कामाची आणि श्रमाची कृत्रिम विभागणी (पुरुषांनी घराबाहेर पैशाचे मोल मिळेल असे काम करणे, आणि महिलांनी घरात, कुटुंबासाठी बिनमोलाचे काम करणे वगैरे) मोडीत काढलीच पाहिजे. ट्रान्स ओळख समजून घेण्यासाठी उदाहरण द्यायचे झाले तर पिंजऱ्यात अडकलेला पक्षी जसा तडफडत असतो त्याचप्रमाणे नको असलेल्या शरीरामध्ये अडकलेलं मन उदास आणि कुंठीत होत असते.

आता ट्रान्स, सिस असे शब्द आले कुठून? Latin भाषेत सिस (cis) या शब्दाचा अर्थ 'या बाजूला', आणि ट्रान्स (trans) चा अर्थ 'त्या बाजूला' असा आहे. सेंद्रिय रसायनशास्त्र शिकत असताना आपण भौमितिक आईसोमेरीजम शिकलो आहोतच त्याची थोडी आठवण करून देते. रासायनिक सूत्र समान परंतु रचना वेगळ्या असल्या तर पदार्थाचा गुणधर्म बदलतो. सिस म्हणजे दोन समान गट दुहेरी बंधाच्या (डबल बॉंड)किंवा रिंग structure च्या एकाच बाजूला स्थित असतात. ट्रान्स म्हणजे दोन समान गट विरुद्ध बाजूला स्थित असतात.

व्यक्तीची ओळख म्हणून १९७४ मध्ये transgender हा शब्द वापला गेला असं वाचनात आले आहे. त्यानंतर, केवळ 'वेगळे' असतात त्यांनाच का लेबल लावायचे असं प्रश्न विचारून डेनाडीफॉस (DanaDefosse) ने १९९४ मध्ये स्वतःला 'नॉर्मल' म्हणवून घेणाऱ्या लोकांसाठी cisgender हा शब्दप्रयोग वापरला. सोप्या शब्दांत मांडायचे तर माझ्या जन्मानंतर तुम्ही म्हणालात की ही मुलगी आहे आणि मला जर ते आयुष्यभर मान्य राहीलं




तर मी 'सिसजेन्डर'(cisgender). मात्र मला तसं वाटत नसेल तर मी ट्रान्सजेन्डर. माझ्याबद्दल माझी ओळख मी ठरवणे हे खरं तर सर्वमान्य असायला हवे, मात्र ट्रान्स असण्याची ओळख सोपी नसते ही खेदाची बाब आहे. मी ट्रान्सजेंडर आहे म्हटलं तर त्यानंतर मी बायकांच्या गटात येऊ शकतो का? जरी मी स्वतःला पुरुष समजत असलो तरीही माझे शरीर बाईचे असल्यामुळे मी गरोदर राहू शकतो, मग हॉस्पिटलमध्ये गेल्यावर मला कोणत्या वॉर्डात ठेवणार? कोणत्या बाथरूममध्ये जायचं? म्हणून ट्रान्स व्यक्तींसाठी वेगळे वॉर्ड असणे गरजेचे आहे, सर्व ठिकाणी जेंडर न्यूट्रल बाथरूम असाव्या लागतील. विशेष गरजा काय आहेत आणि त्यासाठी काय करावे लागेल हे आपण ऐकायला तयार असू तर आपल्याला कुणीतरी ते सांगेल. आपल्याला याबाबतीत जे प्रश्न पडलेत त्यांची उत्तरं आधी म्हटल्याप्रमाणे संबंधित कम्युनिटीच देऊ शकणार आहेत. आपल्या डोक्यात असलेले भय, मिथक, पूर्वग्रह यांचं निरसन तेव्हाच होईल, जेव्हा आपण ऐकायला शिकू, आतून बदलायची तयारी आणि हिंमत करू.

पूर्वग्रह दूर करण्यासाठी काय करावे लागेल? मला असे म्हणायचे आहे की, हा पूर्ण चित्रपट बदलण्याची गोष्ट आहे. डायरेक्शन बदलावी लागेल, स्क्रिप्ट बदलावी लागेल, भाषा बदलावी लागेल- पुल्लिंगी शब्द भव्यदिव्य दर्शवणारे आणि स्त्रीलिंगी शब्द नाजुकपणा, दुय्यम स्थान दर्शवणारे आहेतच ना (तो महाल, ती झोपडी; तो डोंगर, ती टेकडी इत्यादी); तसेच दलित जाती, अल्पसंख्य धर्मांबद्दल आणि समलिंगी किंवा पारलिंगी व्यक्तींबद्दल घृणात्मक वाक्प्रचार भाषेतून बाद करावे लागतील.

लैंगिकता ही स्वतःहून अतिशय सुंदर असूनसुद्धा आपण तिला भयावह रूप दिले आहे. त्या उलट हिंसाचार हा मुळात बीभत्स असूनसुद्धा त्याला मान्यता दिलेली आहे. आपली मुलं हिंसक फिल्म बघत असतात. मात्र लैंगिक अंश असलेली फिल्म दाखवायला आपण कचरतो, कारण लैंगिकतेबाबत आपल्या मनात खूप मिथके आहेत. लैंगिकतेचे शिक्षण दिले तर युवा पिढी वाया जाईल याच्यापेक्षा मोठे मिथक नाही. लहान मुली आणि मुलगे यांच्यावर सर्रासपणे जे लैंगिक अत्याचार होत असतात त्यापासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी मुलांचे ऐकून घेणे, त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवणे, छळ करणारी व्यक्ती घरातील आहे की बाहेरची हे समजले तर हस्तक्षेप बदलतील याचे भान आवश्यक असते. अनेकदा लैंगिकतेबद्दल मुले आणि युवांशी संवाद करण्यास विरोध अत्याचार करणाऱ्यांकडून होत असतो असा अनुभव राहिलेला आहे.

दुसरं मिथक म्हणजे पुरुषाची ओळख लैंगिकतेच्या चष्म्यातून आणि बाईची ओळख पुनरुत्पादनाच्या भूमिकेतून बघणे. खरं तर पुरुषाचे शरीर कायम प्रजोत्पादनाशी जोडलेले असते (लैंगिक

संबंधात शुक्रबीजे बाहेर पडणे), मात्र स्त्रीच्या लैंगिक क्रियेशी तिचे अंडं पिकण्याचा थेट संबंध नसतो. त्या अर्थाने बाई पुरुषापेक्षा जास्त मोकळी आहे. पितृसत्तेत महिलेच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवले जाणे, पुरुषाने गर्भनिरोधक वापरण्यास नकार देणे किंवा पितृत्व नाकारणे यामुळे महिला लैंगिक (गरोदर राहू या भीतीमुळे) संबंधांना घाबरतात. पितृसत्तेच्या राजकारणाला नाकारले तर मानवासाठी लैंगिकता हा आनंदाचा अनुभव ठरू शकतो.

तिसरे मिथक म्हणजे विषमलिंगी (heterosexual) आकर्षण हेच नॉर्मल/स्वाभाविक असल्यामुळे त्याबद्दल मुद्दाम शिकवावे लागत नाही. वास्तवात अगदी उलटे दिसते. लहानपणापासून बहुला-बाहुलीचे लग्न, प्रत्येक कथानकात किंवा सिनेमात मुलगा मुलगी भेटणे, मोठे झाल्यावर लग्न होणारच अशी धारणा पक्की केली जाणे – हे सर्व विषमलिंगी होण्यासाठीचे ट्रेनिंग नाही तर काय म्हणायचे? यामुळे विषमलिंगत्वाचे वर्चस्व (hegemony) निर्माण होते. इतर सर्व लैंगिक आकर्षणे अनैसर्गिक आणि तुच्छ अशी समज पक्की होते. यालाच hetero normativity म्हटले जाते. पुढे जाऊन स्त्री-पुरुष अशा घट्ट चौकटीत न बसणारे लैंगिक उतरंडीत खाली असणे ही धारणा समाजात पक्की असल्याकारणाने cis-hetero normativity चे परिणाम ट्रान्स व्यक्तींना क्षणोक्षणी भोगावे लागतात.

लैंगिक उतरंडीत वेश्याव्यवसायात असलेल्या व्यक्ती सर्वात खाली असतात यावर दुमत नसावे. एखाद्या महिलेचा अपमान करायचा असेल तर तिला वेश्या म्हणायचे! अगदी आपल्या संस्थेच्या कार्यकर्त्यांना 'रात्री अपरात्री या बाया काय करतात हे आम्हाला माहीत आहे' असे उद्गार नेहमीच ऐकायला मिळतात. त्यांच्या नवऱ्यांना 'तू मर्द आहेस का, बायकोवर कंट्रोल नाही तुझा' असं म्हणून हिणवलं जातं. बाहेर पडणारी बाई ही शुद्ध नसते, किंबहुना कारणाशिवाय बाईला घराबाहेर पडायची गरजच काय असा प्रश्न विचारला जातो.

मी वयाच्या विशीमध्ये असताना मुंबईमध्ये घराजवळच्या हॉटेल बाहेर थांबले होते. संध्याकाळी सात-साडेसातची वेळ असेल. तेव्हा दोन पुरुष असलेली एक गाडी माझ्यापाशी येऊन थांबली. एका पुरुषाने मला विचारलं, 'येणार?' मी 'नाही' म्हटलं. तेव्हा दुसरा पुरुष म्हणाला, 'सॉरी, हं! मी त्याला म्हटलं, तुम्ही तशा दिसत नाही आहात.' मी म्हटलं 'मी तशीच आहे, पण मी नाही म्हटलंय.' अशी, तशी या बाईच्या बाबत केलेल्या पुरुषी विभागण्या आहेत. मात्र, 'नाही' या शब्दाला एकच अर्थ आहे, तो कोणीही म्हटला असला तरी.

तो पुरुष मला वेश्या समजला यात मला लाज का वाटावी, तळपायाची आग मस्तकाला का जावी हा माझा पुढचा प्रश्न आहे. मी ज्या ठिकाणी उभी होते, त्या ठिकाणी खरंच माझ्या पुढे मागे एखादी महिला धंदा करायला येऊ शकत होती. तिला सुद्धा हो किंवा नाही म्हणायचा अधिकार असायला हवा ना? काही वर्षांनंतर मी पुण्यातील बुधवार पेठेतील महिलांच्या सानिध्यात आले तेव्हा लैंगिकतेच्या बाबतीत नीतीमूल्याचा मोलाचा धडा मला वेश्याव्यवसायातल्या एका महिलेनी शिकवला. ती म्हणाली, 'तुम कितने के साथ बैठते उससे फरक नही पडता. तुम कैसा बैठते उससे फरक पडता'. आहे की नाही ती गुरु? कोणाबरोबर तरी पंधरा मिनिटांचा संबंध ठेवणारी महिला मला इतके महत्त्वाचे एथिक्स शिकवते! थोडक्यात काय तर लैंगिक अनुभव घेताना, किंवा नातेसंबंध ठेवत असताना आतमध्ये सुरक्षित जा, एकमेकांचा आदर राखत सुरक्षित राहा आणि बाहेर पडताना एकमेकांचा आदर राखत सुरक्षितपणे बाहेर पडा, मग तो अनुभव/संबंध आयुष्यभराचा असो किंवा क्षणिक असो. लैंगिक नात्यात/संबंधात कन्सेंट आणि प्रामाणिकपणा हे घटक महत्त्वाचे असतात हे मला तिने अल्पशा शब्दांत सांगितले.

वकिलीची परीक्षा दिल्यावर माझी मुलगी सांगली-मिरजमध्ये संग्राम संस्थेत आठ-दहा दिवसांसाठी गेली होती. एकदा वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांच्या आणि पारलिंगी व्यक्तींच्या वस्तीमध्ये ती गप्पा मारत होती. थोड्या वेळाने ती गच्चीवर गेली. बघता बघता गल्लीत पुरुषांची गर्दी जमा झाली. 'ये नयी कौन है? जो भी किमत है बोलो' असे उद्गार ऐकल्यावर खालून दोघी तिघी धावत वर गेल्या आणि तिला घेऊन खाली आल्या, खजील झाल्या. तेव्हा ती त्यांना म्हणाली, "तुम्ही माझ्या घरी येता तेव्हा माझ्या आईच्या मैत्रिणी असता. मग मी तुमच्या घरी आले आणि इथले लोक मला वेश्या समजले तर त्यात आश्चर्य काय आहे? त्यांनी मला काही केलं तर नाही ना?" चांगली आणि वाईट बाई या पितृसत्तेने उभारलेल्या भिंती आपल्याला तोडायला लागणार आहेत. विवाहांतर्गत (जिथे लैंगिक संबंध ठेवण्यास समाजाने मान्यता दिली आहे) सुद्धा पितृसत्ताने लैंगिकतेला अंधारात तीन मिनिटे एकमेकांशी न बोलता केलेला संभोग इतके तोकडे करून टाकले आहे. मूल जन्माला घालण्यापुरते, आणि पुरुषाची गरज पूर्ण करण्यापुरते झाले की बस! त्या नंतर दिवसा बायकोशी इतके कोरडे वागायचे की माझ्या ओळखीच्या बाई एकदा नवऱ्याला म्हणाल्या, "आंखे फाड के देखो, मैं वही हूँ जो रात में थी."

शिबिरांमध्ये मला मुलग्यांनी खूप वैयक्तिक प्रश्न विचारले आहेत त्यापैकी एक व्यक्त होणारी खंत म्हणजे 'मला लैंगिक अनुभव नाही'. एकाने विचारले 'माझ्या मैत्रिणीशी मला लग्न करायचं आहे, पण तिला मी सुख देऊ शकेन याची मला खात्री नाहीये. मी त्या आधी वेश्येकडे जाऊ का?' मी म्हणाले, 'यात तीन व्यक्ती दिसत आहेत – तू, तुझी मैत्रीण आणि वेश्याव्यवसाय करत असलेली महिला.

**(पान ५५ वर)**